P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक – १०/०५/२०२४**

## लोकसभा निवडणुक २०२४ च्या पार्श्वभुमीवर पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत सीआरपीसी कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहिर झाला असुन दिनांक १६/०३/२०२४ रोजी आदर्श आचारसंहिता लागु झालेली आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ३३ मावळ, ३४ पुणे, ३६ शिरुर असे तीन लोकसभा मतदारसंघ येतात.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील २०२४ सार्वत्रिक लोकसभा निवडणूक मतदान प्रक्रिया, शांत, निर्भय व निःपक्षपाती वातावरणात पार पाडावी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत दिनांक ०४/०५/२०२४ रोजी ००.०१ वा.पासुन ते दिनांक १४/०५/२०२४ रोजी २४.०० वा. पर्यंत मा.पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे यांनी फौजदारी प्रक्रिया दंड संहिता (सीआरपीसी) चे कलम १४४ (१) अन्वये १) मतदाना दिवशी मतदान केंद्रात तसेच मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात प्रिसायडींग ऑफिसर, निवडणुक कामकाज संदर्भाने नेमलेले शासकीय व्यक्ती, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्तासाठी नेमलेले शासकीय व्यक्ती ज्यांना निवडणुक संदर्भाने संपर्क करणे आवश्यक आहे. यांचे व्यतिरिक्त इतर व्यक्तींना मोबाईल फोन, स्मार्ट फोन, वायरलेस किंवा संपर्क साधने वापरणेस मनाई करणे जरुरीचे आहे. २) मतदान केंद्राचे २०० मीटर परिसरात तात्पुरते स्वरुपाचे पक्ष कार्यालय कोणत्याही धार्मिक, शैक्षणिक आस्थापनेत किंवा किंवा अतिक्रमण करुन उभारणेस मनाई करण्यात येत आहे. ३) संरक्षण प्राप्त व्यक्तींना मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात सुरक्षा रक्षकासह प्रवेश करण्यास मनाई आहे. ४) मतदान केंद्राचे २०० मीटर आतमध्ये इलेक्शन बुथ लावता येणार नाही. एका इमारतीत एकापेक्षा जास्त मतदान बुथ असतील तरी देखील त्या इमारतीसाठी एका उमेदवाराला एकापेक्षा जास्त बुथ लावता येणार नाही. ५) मतदान दिवशी मतदान केंद्राचे २०० मीटर क्षेत्रामध्ये प्रचार करण्यास मनाई आहे. ६) मतदान केंद्राचे २०० त्रिजेमध्ये वाहन आणण्यास मनाई आहे. ७) लाऊड स्पीकर, मेगाफोन, आरडाओरडा करणे, गोंधळ करणे,दुवर्तन करणे, अशा प्रकारास मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आहे. ८) मतदान समाप्ती करीता निर्धारीत केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासुन ज्या मतदारसंघात मतदान होणार आहे तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते वा प्रचार कार्यकर्ते त्यांना त्या मतदारसंघात थांबणेस मनाई करण्यात येत आहे. ९) मतदान समाप्ती करीता निर्धारीत केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासुन राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने कोणतेही बल्क मॅसेज पाठविण्यास मनाई करण्यात येत आहे. १०) मतदान दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचे शस्त्र/ हत्यार बाळगणे असे मनाई आदेश जारी करण्यात आलेले आहेत.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन करणा-या व्यक्तींवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल असे आदेश दिलेले आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पिंपरी चिंचवड आयुक्तालय